# महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार

**श्री. सतीश हरिदास मेश्राम,** संशोधक विद्यार्थी, अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ

---

**प्रस्तावना :-**

महात्मा गांधींच्या आर्थिक विचारात त्यांनी भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेवर अधिक भर दिला आहे. ग्रामीण भागाच्या विकासाशिवाय देशाचा विकास होणे शक्य नाही. त्यांचा देश स्वावलंबी होण्यावर अधिक भर होता. स्वयंपूर्ण खेडी असाव्यात. भारतातील साडेसात लाख खेड्यांमध्ये खरा भारत आहे, असे ते मानत. म्हणूनच तर महात्मा गांधीनी खेड्याकडे चला' असा संदेश दिला. भारताला स्वातंत्र्य मिळून साडेसात दशके उलटली आहेत. स्वातंत्र्यपूर्व भारत व स्वातंत्रोत्तर भारत यात फार मोठ्या प्रमाणात फरक आढळून येतो. तरी इतक्या वर्षांनंतरही महात्मा गांधींचा विचार समजण्यास मार्गदर्शन करणारा ठरतो. महात्मा गांधींनी आर्थिक विषयावर फारसे भाष्य केलेले नाही. खरे तर ते अर्थतज्ञ ही नव्हते. त्यांचे बरेचसे विचार राजकीय होते परंतु त्यांचे जे काही आर्थिक विचार आहेत ते अत्यंत दूरगामी होते. महात्मा गांधी समाजकारण सोबत अर्थशास्त्राचे देखील मार्गदर्शक ज्ञानी होते. हे त्यांच्या आर्थिक विचारातून जाणवते. भारताची तत्कालीन दयनीय अवस्था का निर्माण झाली, कोणी निर्माण केली, त्यासाठी कोण व कसे जबाबदार आहे, त्यापासून धडा घेऊन आता कसे सावध व्हावे, यासारख्या आर्थिक प्रश्नांचे समर्पक ज्ञान त्यांना होतेच. म्हणूनच तर त्यांनी भूतकालीन घटकांचा परामर्श घेऊन भविष्यकालीन ध्येयपूर्तीसाठी वर्तमानातील योग्य वाटचालीला महत्त्व दिले. त्या दृष्टीने प्रस्तुत अध्ययन केले आहे.

**1. म. गांधीजीचे आर्थिक विचार :-**

ब्रिटीश राजवटीत लयास गेलेली भारतीय अर्थव्यवस्था, निर्माण झालेली विषमता, बेकारी, दारिद्र्य या सर्व काळोखात सूर्य उगवावा तसे गांधीजींनी भारतीय जनतेला केलेले आर्थिक विचारांचे मार्गदर्शन अतिशय मौलिक आहे. भारतीय जनतेसमोरील समस्या व गांधीजीचे आर्थिक विचार जाणून घेऊया.

**1. ग्रामीण अर्थव्यवस्था :**

गांधीवादाच्या परिकल्पनेनुसार खेडे हे सर्वात महत्त्वपूर्ण समाजवस्ती आहे की, जी स्थायी अर्थव्यवस्था आणि निती विकासात सतत मदत करत असते. सामुदायिक एकता कृषी आणि उद्योगाचे सर्व समावेशक विकास, सामाजिक सेवा, संस्कृती, मानवोत्कर्ष, स्वातंत्र्यता इत्यादीचे केंद्र खेडे आहे. गांधीजी कोणतीही अवास्तव कल्पना करीत नाहीत तर त्यांनी मानवतेच्या सक्षमतेवर लक्ष ठेवले होते. त्यानुसार ते विचार मांडत असत. भारत या सगळ्या प्रयोगाची प्रयोगशाळाच आहे. गांधीजींनी ग्रामीण विकासाची जी परिकल्पना मांडली ती एक आदर्श आणि समग्र विकासाची परिकल्पना आहे. खेड्यांच्या विकासासाठी ग्रामस्वराज्याला ते आदर्श मानतात. त्यांना हे मान्य होते की, ग्रामस्वराज्याचीच आमच्या देशाला आज सर्वात मोठी गरज आहे. जोपर्यंत खेडे स्वतंत्र होणार नाहीत तोपर्यंत देशातील स्वातंत्र्याला काहीही अर्थ राहणार नाही. ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या नवनिर्मितीसाठी कुटीर उद्योग उभारण्याचे स्वातंत्र्य देणे आवश्यक आहे.

**ब) ग्रामोद्योग :-**

खेड्याच्या विकासासाठी गांधीजीने शेती आणि खादीसारख्या ग्रामोद्योगाला महत्त्वपूर्ण मानले होते. ते म्हणत की, 'ग्रामोद्योगामागे माझी अशी कल्पना आहे की, आमच्या रोजच्या आवश्यक असणा-या गोष्टीची पूर्तता खेड्यातच होणे आवश्यक आहे.' देश्याच्या अर्थव्यवस्थेमध्ये ग्रामोद्योग कौशल्य आणि लहान – सहान गोष्टीसाठी चालणाऱ्या उद्योगाचे महत्वपूर्ण स्थान आहे. त्याचबरोबर देशाची सर्वात मोठी समस्या बेकारी हि आहे. त्यामुळे गांधीजी पुढे म्हणतात की, पैश्याचे अर्थशास्त्र आपला दृष्टीकोन धूसर करतो. म्हणून त्यांची इच्छा होती की, जेव्हा अर्थशास्त्रात आणि जीवनात ग्रामीण दृष्टीकोन प्रवेश करेल, तेथेच बनविलेल्या वस्तूंचा उपयोग करण्यासाठी जनतेचे मन वळेल तेव्हाच भारतात संपत्तीचे समान वितरण आणि देशात समता प्रस्थापित होईल. आज संपत्तीचे वितरण शहरात होईल व परिणामी शहरातून विदेशात जात असते. या प्रवाहाला बदलणे आवश्यक आहे.

**2. श्रम प्रतीष्ठे संबंधी विचार :-**

गांधीजी कोणत्याही प्रकारच्या कामाला कमी प्रतीचे समजत नसत. त्यांच्या मते, 'श्रम है संपत्ती किंवा भांडवलापेक्षा कमी नाहीत. गांधीजी म्हणत श्रमाची किंवा कामाची पुजा करावी, कारण श्रम हाच देव आहे. तसेच श्रम हाच आरोग्य चांगले ठेवण्याचा एकमेव मार्ग आहे. गांधीजी म्हणत, श्रम हा निसर्ग नियम आहे. व्यक्ती या नियमाचे पालन करणार नाही, तो स्वतः अडचणीत येईल. श्रमामुळे मनुष्याचे शरीर चांगले राहते. त्याचबरोबर शक्तीदेखील मिळते. ते म्हणत श्रम म्हणजे जीवनातील शाप नसून आनंद आहे. म्हणून श्रम हे प्रत्येक मानवाचे पवित्र कर्तव्य होय व जे लोक काम न करता फक्त सुट्ट्या घेतात त्यांचा गांधीजीना तिरस्कार वाटत होता.

**3. साधनसंपत्तीविषयक दृष्टीकोन :-**

गांधीजींच्या मते जी साधन संपत्ती मुबलक आहे. तिचा जास्त वापर म्हणजे सागरी अर्थनीती होय. याउलट जि साधनसंपत्ती कमी आहे तिचा भरपूर वापर म्हणजे तलाव अर्थनीती होय. म्हणून जर कमी साधनावरील अर्थनीती वापरली तर स्पर्धा वाढेल, हिंसा निर्माण होईल यासाठी लोखंडाचा कमी वापर, लाकडाचा जास्त वापर करावा. तसेच कोळसा पेट्रोल यासारखे इंधन वापरण्याएवजी पशुशक्तीचा जास्त वापर करावा. कापड गिरण्या तलाव, चरखा यांचा वापर जास्त करावा. आणि पुनत्पादन साधनाचा काटकसरीने कमी वापर करावा असे ते सांगतात.

**४) विश्वस्त संकल्पना :-**

महात्मा गांधींनी मांडलेली विश्वस्त संकल्पना भावनिकतेवर, मानवतेवर आधारित असून देशात जी गरीब-श्रीमंताची दरी निर्माण झाली आहे, त्यातून वर्ग-संघर्ष उभा राहतो. त्याऐवजी श्रीमंतांनी त्यांना मिळालेल्या अतिरिक्त संपत्तीचा स्वतःला मालक न मानता, त्या संपत्तीचा संरक्षण करता विश्वस्त मानावे. संपूर्ण जगावर ईश्वराचीच मालकी असून आपणास केवळ एक विश्वासु म्हणून निवडले आहे. श्रीमंतांनी त्यांच्या संपत्तीतून स्वतःच्या गरजा नक्कीच पूर्ण कराव्यात सोबत इतर गरीब बांधवांसाठी देखील अतिरिक्त उत्पन्न वापरावे. भांडवलदारांनी अधिक मोह टाळून समाजकारणासाठी आपली अतिरिक्त संपत्ती वापरावी.

**5. ग्राम सर्वोदय:-**

महात्मा गांधींनी आदर्श ग्राम संकल्पना मांडली. देशातील दारिद्र्य दूर करायची असेल तर गाव समृद्ध झाले पाहिजे. त्यासाठी उत्पादन, वितरण, विनिमय व उपभोग या अर्थशास्त्रीय क्रिया गावातच पूर्ण झाल्या पाहिजेत. स्थानिक मालाला गावानजीक मागणी आली पाहिजे. यासाठी 'आदर्श खेडे संकल्पना महात्मा गांधींनी मांडली. त्यांच्यामते, असे खेडे निर्माण व्हावे कि, ज्यात सर्वजण कोणते ना कोणते काम करीत असावे. त्यातून निर्माण होणाऱ्या वेगवेगळ्या वस्तु स्थानिक भागातच विकल्या गेल्या पाहिजेत. त्यासाठी प्रत्येकाने वेगवेगळ्या वस्तू उत्पादित करून एकमेकांच्या वस्तूंना मागणी केली पाहिजे. त्यासाठी वस्तुविनिमय पद्धतीचा वापर करावा. ग्रामीण भागात शेती, शेतीपूरक व्यवसाय, छोटेउद्योग, कुटिरोद्योग, ग्रामोद्योग यांचा विकास झाल्याने सगळ्यांना काम मिळत राहील. त्यामुळे बेरोजगारीचा प्रश्न उद्भवणार नाही. तसेच स्थानिक लोकांच्या गरजांच्या पुर्ततेसाठी आयात करायची गरज नसेल असे सर्वांगाने परिपूर्ण खेडी निर्माण झाल्यास देशाचा मोठा विकास करता येतो.

**६) खादीउद्योग :-**

भारतावर अधिराज्य गाजवणाऱ्या ब्रिटनने आपल्या देशात कापड विक्रीच्या नावाने पाऊल टाकले आणि ते राज्यकर्ते बनले. ब्रिटिश काळात देशातील उद्योगांची दयनीय अवस्था झाली होती. ब्रिटिशांनी जाणीवपूर्वक भारतातील उद्योग बंद पाडले होते. इंग्रज भारतातून कच्चामाल इंग्लंडला नेत व तिकडून त्याचे पक्या मालात रूपांतर करून पुन्हा त्याची विक्री भारतात करत असत. शिवाय भारतीय उद्योगांना संरक्षण देणे सोडाच, त्यांना अधिक अडचणी निर्माण करण्यात ब्रिटिश शासन अग्रेसर राहिले. याची संपूर्ण जाणीव महात्मा गांधीना होती म्हणून महात्मा गांधींनी स्वदेशी चळवळीदरम्यान विदेशी कापडांची होळी करा व स्वदेशी कापडाचा वापर करा असा संदेश दिला. त्यात स्वदेशी कापडात खादीचा वापर मोठ्या प्रमानात वाढवण्यावर गांधीजींनी भर दिला. खादीसाठी आवश्यक कच्चामाल कापूस सहज उपलब्ध होतो. कापसापासून सरकी बाजूला काढणे स्थानिक भागात शक्य होते. सरकी बाजूला काढून उर्वरित कापसापासून सुत तयार करण्यासाठी चरख्याचा वापर करावा हे काम शेतीचे काम करून घरी

आल्यावरही करता येत असल्याने खर्चही कमी लागतो. ग्रामीण भागातील महत्त्वाची गरज यातून पूर्ण होईल. थोडक्यात महात्मा गांधी वस्त्र उत्पादनाच्या बाबतीत आपण स्वयंपूर्ण होणे गरजेचे आहे असे म्हणत.

**७) ग्रामस्वराज्य :-**

गांधीजींना स्वराज्याच्या अंतर्गत अशा स्वरूपाचा समाज निर्माण करण्याची इच्छा होती की, ज्यात एक शोषणविरहित सामाजिक, आर्थिक समानता असावी. ट्रस्टीशील सिद्धांच्या माध्यमातून गांधीजी आर्थिक समानता स्थापित करू पाहत होते. राजकीय तसेच आर्थिक विकासाबरोबर सामाजिक विकास हि खेडयाच्या समग्र विकासासाठी आवश्यक आहे. गांधीजी समुद्रासारखे नितळ उथळ समाजरचना करू पाहत होते. गांधीजी म्हणत असत अशी समाजरचना अनेक खेड्यात असावी. त्याचा प्रचार, प्रसार एकानंतर एक अशा प्रकारे परंतु वादळातील लाटासारखे होणे आवश्यक आहे. जीवन हे मिनार प्रमाणे दिखाऊ असू शकत नाही. त्याला वरून निमुळती असून खाली पाया भलामोठा पसरलेला आणि त्यावर त्या मिनारला उभा रहावे लागते. तेथे खेडे समुद्रातील लाटांप्रमाणे एकानंतर एक असतील आणि व्यक्ती त्याचा केंद्रबिंदू असेल.

**८) निष्कर्ष :-**

गांधीजीच्या आर्थिक, सामाजिक विचारांच्या संकल्पना आज खूप उपयुक्त आहेत. कारण त्या मिश्र अर्थव्यवस्थेचा समाजवादी आकृतीचा ढाचा स्पष्ट करतात. गांधीजांनी भारतातील जनजीवनात घडणा-या प्रत्येक घटनावर सर्वांगीण विचार मांडले. त्यामुळे अशी कोणतीही बाजू राहिलेलो नाही की, त्यांनी त्यासाठी आपले अनमोल विचार मांडले नाहीत. लोकशाहीपासून ते ग्रामस्वराज्यापर्यंत ब्रम्हचर्यापासून ते स्त्री सबलीकरणापर्यंत आणि नसबंदीपासून ते दारूबंदीपर्यंत गांधीजीनी गहन चिंतन केले आहे. आणि त्यावर व्यावहारिकदृष्ट्या उपाय सांगितले आहेत. म्हणून गांधीजी आमच्यातील एक अशी विभूती आहेत की, त्यांचे जोवन आपल्या सांस्कृतिक जीवनाचा एक प्रमुख अविभाज्य भाग बनलेले आहेत. ज्या एका नावाने भारतातील सर्व वर्ग समूह आणि क्षेत्रातील लोकांना एकत्र आणले जावू शकते ती शक्ती त्यांच्या विचारात आहे. तत्कालीन गांधी विचार आजच्या विकसनशील भारताला किती तंतोतंत लागू करण्याजोगे आहेत हे यावरून सिद्ध होते.

**संदर्भ ग्रंथसूची :-**

1. कविमंडन विजय, आर्थिक विचारांचा विकास, श्री. मंगेश प्रकाशन नागपूर, १९९०.
2. कुमार आप्पा. डॉ. जे.सी. अहिंसेचे अर्थशास्त्र, महाराष्ट्र ग्रंथभांडार मुंबई
3. चव्हाण जी. व्ही. आणि हळदेकर एम.बी. (२०१४), आर्थिक विचारांचा इतिहास, नांदेड : राऊत पब्लिकेशन, पृ. १७१ ते १७७.
4. मिश्र आर.पी. (१९९४), ग्राम स्वराज्य : ग्रामीण विकास का आदर्श मॉडेल, अक्तुबर, कुरुक्षेत्र हिंदी मासिक, नई दिल्ली : सूचना और प्रसारण मंत्रालय, भारत सरकार प्रकाशन.
5. मासिक – योजना, अर्थसंवाद लोकराज्य.
6. व्यास हरिप्रसाद (२००३), महात्मा गांधी ग्राम स्वराज्य, अहमदाबाद नवजीवन प्रकाशन मंदीर, पृ.क्र. १२१.
7. विकीपीडीया – महात्मा गांधी
8. आर्थिक विचारांचा इतिहास – प्रा. रायखेलकर.